PARLE **MAHOTSAV**

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE **MAHOTSAV**

<u>कृपया प्रसिध्दीसाठी</u>

# १३व्या पार्ले महोत्सवाचे उद्‌घाटन ”महिला सुरक्षा दौडने ”

दि. १९.१२.२०१२

मुंबईः१३ व्या पार्ले महोत्सवाचे उद्‌घाटन रविवार,२३ डिसेंबर, २०१२ रोजी सकाळी ६.३० वाजता ” महिला सुरक्षा दौडने” करण्यात येणार असुन अनेक कलावंत,क्रिडापटूंसह पार्लेकर मोठ्या संख्येने भाग घेणार आहेत. महोत्सवामधील स्पर्धांच्या माध्यमातून सद्याच्या ज्वलंत विषयाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न आहे. सद्या मुली व महिलांच्या छेडछाडीचे व त्यांच्यावरील हल्यांच्या प्रकरणावरून वाद होत आहेत. या विरोधात जनजागृती करण्याच्या दृष्टीने महिला सुरक्षा दौड आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती पार्ले महोत्सवचे प्रमुख आयोजक ॲड.पराग अळवणी यांनी दिली. या दौडमध्ये तरुण मुले-मुली आपल्या शाळा-महाविद्यालयांच्या बॅनरसह दौडमध्ये भाग घेणार असून बॅनरवरील सवोत्कृष्ट घोषवाक्यास विशेष बक्षिसे देण्यात येणार आहेत.

महोत्सवाच्या पहिल्याच दिवशीच्या ” महिला सुरक्षा दौड” नंतर पुरूष व महिला गटाच्या विविध वयोगटांमध्ये १२ शर्यती घेण्यात येणार असुन सुमारे ३००० धावपटू यामध्ये भाग घेतील. त्याच दिवशी महिलांसाठी होम मिनिस्टर, जेष्ठ नागरिकांसाठी विशेष स्पर्धा घेण्यात येईल. तसेच स्लो सायकलिंग, कबड्डी व बॉक्स क्रिकेट, गायन, गोळाफेक व ५० मिटर धावणे अशा स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

दरवर्षी प्रमाणे पार्ले महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून यावर्षी सुमारे २५ हजार स्पर्धक महोत्सवामध्ये भाग घेणार आहेत. १३ व्या पार्ले महोत्सवाची जय्यत तयारी सुरू असून सुमारे १५०० कार्यकर्त्यांची फौज यासाठी कार्यरत आहे. २३ डिसेंबर रोजी होणाऱ्या ”महिला सुरक्षा दौड” तसेच मॅरेथॉन शर्यतीमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन ॲड.पराग अळवणी यांनी केले असून इच्छूकांनी स्व. बाळासाहेब ठाकरे क्रिडानगरी, दुभाषी मैदान, विलेपार्ले (पूर्व )येथे उपस्थित रहावे, अशी विनंती केली आहे.

---

सदर पत्रक श्री.चरणजीत सिंग संधू, सहआयोजक पार्ले महोत्सव यांनी प्रसिध्द केले आहे.